# वृश्चिक राशीफ़ळ ( Vrushchik Rashiphal )



वृश्चिक राशीफ़ळ ( Vrushchik Rashiphal )

**(8) वृश्चिक-**

वृश्चिक राशीचक्रातील ८ वी राशी आहे. या राशीचा स्वामी मंगल असून विशाखाचे ४ थ चरण, अनुराधा व ज्येष्ठा नक्षत्र या राशीत येतात. ही फ़लदायी, स्थिर, हिंसक, दीर्घ उदीत, मौन, स्त्री, जलराशी आहे. याराशीत कोणताही ग्रह उच्च नसतो. चंद्र वृश्चिक राशीत कमजोर असून नीच असतो. शुक्रा करता ही राशी हानीकारक ही आहे. सूर्य व गुरु या राशित स्थित असता मित्र घरी मानले जातात. शनी, बुध, शुक्र या राशीमधे स्थित असतील तर शत्रू घरी मानले जातात.

वृश्चिक राशी २ प्रकारचे फ़ळ देऊ शकते. उच्च वृश्चिक जातक आपल्या इंद्रियांना नियंत्रित करुन जितेंद्रिय म्हणवतात. हेच कारण आहे की श्रीकृष्ण कालिया सर्पावर उभे आहेत व आपल्या काबूमधे ठेवले आहे. नीच प्रकारचे लोक प्रतिव्देषी व भ्रष्ट असतात. त्यांची आत्मशक्ती बळकट असते पण ते असंगत असतात. त्यांना माहीत असते की इतरांना कशाप्रकारे ताब्यात ठेवावे, पण स्वत:स नियंत्रित ठेवू शकत नाहीत.

**1.शारिरिक आकृती-** वृश्चिक राशी जातक शरीर सुगठीत. व बांधणी उत्तम असते.

सामान्यपणे हात लांब असतात. मध्यम उंच असतात. रुंद चेहरा, अधिकारपूर्ण दिखावट, छोटे व कुरळे केस, मांसल शरीर व चांगले व्यक्तिमत्त्व असते.

**2. विशेषता-** स्थिर राशी असल्याने स्थिर मेंदूवाले असतात. जेव्हा तुम्ही एखादे विशिष्ट उद्देश डोक्यात घेता, मग रेंगाळत न राहता, तो उद्देश ठेवून च कामास लागता. तुम्ही फ़ार काळ रिकामे स्वस्थ बसू शकत नाही. जोपर्यंत ठरवलेले काम पूर्ण होत नाही, वेळ घालवत नाहीत. विघ्न वा अडचणी आल्यास त्यातुन मार्ग काढण्यासाठी कठोर परिश्रम करतात पण चिकाटी सोडत नाही संघर्ष करत राहता.

जल राशी असल्याने बुद्धी तीक्ष्ण व तेज असते. तुम्हाला तुमच्या योग्यतेची व सामर्थ्याची जाणीव नसते अथवा उशीरा जाणीव होते. पण जेव्हा एखादे काम हाती घ्याल तेव्हा हेच सिद्ध होईल की तुमच्यामधे परिपूर्ण स्वयंशक्ती आहे व तुम्ही तुमचे कार्य विनाआराम पूर्ण कराल. संभवता मारुतीचा जन्म या राशीमधे झाला असावा.

जल राशी असल्याने तुमच्या मधे परिपूर्ण भावना व विचारशक्ती व आत्मशक्ती असेल. त्यामुळे तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती होऊ शकाल. तुम्ही एक उत्तम आलोचक आहात तसेच साधनपूर्ण आहात. सर्व आर्थिक मामल्यांमधे योग्य आत्मशक्ती व कार्यकुशल असल्याने खुप सफ़लता मिळेल. तुम्ही सांसारिक सुखाचा व भौतिक सुखांचा पूर्ण आनंद आयुष्यात मिळवाल.

राशीस्वामी मंगळ तुम्हाला आत्मविश्वास युक्त प्रेरक कार्य, हिंमत, दृढता, स्वतंत्रता, उत्तेजना, शक्ती संपन्नता देते. तुमची स्वत:ची अशी आवड निवड असते. तुम्ही अतिवादी असता, व्यवाहारिक अतिरेक असेल नसेल पण असावधानी वा बेफ़िकीरीची सवय असू शकते. तुमची प्रकृती इतरांवर हावी होण्याची व त्यांना नियंत्रणात ठेवण्याची आहे.

तुम्ही हट्टी असला तरी विश्वस्त असता. तुम्ही एकांतप्रिय असता. आपले संघर्ष करत असताना अपाल्या मुलांची काळजी घेण्यासाठी खंबीर असता.

मंगळामुळे तुम्ही प्रसंगी मानसिक संतुलन गमवता. तुम्ही शीघ्र कोपी आहात व संभवत: तुम्हांस गरम पेय पिण्याची सवय असते. कधी कधी रागाच्या भरात वा नुकसानीच्या भीतीने तुम्ही घाई करुन अविवेकी काम करु शकता. तरी संयम बाळगा.

वृश्चिक मौन राशि आहे. निसर्गाच्या सानिद्ध्यात रमायला आवडते. वृश्चिक जातक एकांतात काम व संशोधन करु शकतात. ते आपल्या मार्गाने जातात. तुम्ही कोणत्याही सिद्धांतास एकदम स्वीकारणार नाही, जे पूर्वापार आहेत. तुम्ही विवेकपूर्ण विचार, विश्वास, तर्क, अनुभव व शास्त्रीय गोष्टी तपासून मग ग्राह्य धराल. तुम्ही जुने रीतीरिवाज अनुकरण करणार नाही पण त्याचा अनादर ही करणार नाही.

तुम्ही वायफ़ळ गप्पेबाजी, फ़ुशारकी, अफ़वा, काळाबाजार ची घृणा करता. तुम्ही थोडेच बोलता प्ण तुमचे शब्द युक्तीचे असतात. तुम्ही सामान्यपणे अंतिम क्षणांमधे एखाद्या गोष्टीला एकदम कलाटणी देता. अगदी अल्प काळामधे निष्णात होता व सफ़लता मिळते. वृश्चिक थोडे ऊशीरा धावण्यास सुरुवात करतात व प्रथम स्थान प्राप्त करतात.

तुम्ही इतरांचे बाबतीत स्वत:हून हस्तक्षेप करत नाहीत. तुम्ही तेव्हाच सहभागी होता, जेव्हा कोणी तुम्हास मदतीसाठी संपर्क करेल. तुम्ही सरळ व स्पष्ट्वादी व नेमके रोखठोक बोलणारे व मताचे असता. तुमची वास्तविकता ही आहे की तुम्ही थोडे रहस्यमयी असता व इतरांची आलोचना करता तेव्हा व्यंगात्मक वा उपरोधिक शब्द वा ढंगात बोलता. तुम्ही स्वत:चा बचाव करण्याकरता हुकमी एक्का राखून ठेवाल. तुम्ही शत्रूच्या शक्तीचा योग्य अंदाज बांधता व पूर्ण सतर्क राहता. व महत्वपूर्ण असे एक कमजोर बाजू शोधून काढता व वेळ्प्रसंगी उपयोग करण्यासाठी गुप्त ठेवता. वृश्चिक जातक चलाख असतात, पण ज्यांना आपले

मानता त्यांचे साठी खरे, ईमानदार, विश्वसनीय असता. तुम्ही असे तोपर्यंतच असाल जोपर्यंत तो तुम्हास दगा वा नुकसान करत नाही, नंतर मात्र तुम्ही त्याचा बदला घ्याल व निर्दयी असाल.

**3. कमजोरी-** कोणाची बोचरी चेष्टा करु नका. तुमच्या सहायकाकडून अशी अपेक्षा ठेवू नका की तुम्च्या सारखेच चतुर व परिश्रमी असतील. मन व राग संतुलित ठेवा. एखादे छोटे नुकसान झाले तरी डोके शांत ठेवा, ते तुम्ही सहन वा भरुन काढण्याची क्षमता असते, पण तुमचा राग त्याचा खुप विध्वंस करु शकतो.

**4. धन व संपत्ती-** वृश्चिक राशी जातक धनप्राप्तीत भाग्यवान असतात व कोणताही धंदा वा नोकरी असू दे, जोखीम त्यांना पैसा मिळवून देते, सट्टा त्यांना लाभ देणारा असतो. कारण २ रे (धन स्थान ) व ५ वे स्थानाचा अधिपती गुरु आहे. जो संपत्तीत वाढ करतो. अकस्मिक रुपाने प्राती होते जी विशेष स्वरुपाची असते. ते घर, जमीन जुमला, फ़ार्म, वाहन ई गोष्टी प्राप्त करतात. त्यांना हे चांगले प्रकारे माहीत असते की कशा प्रकारे पैसा कमवावा. व तसेच खर्चिक ही असतात.

**5. नोकरी व्यवसाय-** वृश्चिक राशी रसायन, औषधी, वीमा, दारु संबंधित, बॉयलर, स्टीम इंजिन, ऑटोमोबाईल, खाण, मिलिटरी, जलसेना, चहा-कॉफ़ी, तंबाखू, तांबे, तांदूळ, खनीज, घोडे, हत्ती, दगडाचा पृष्ठभाग, जमीन खोदणे, मोठे सर्जन, संशोधक, गुप्त पोलीस, डिटेक्टिव्ह, शिपाई, न्हावी, कसाई, दंत चिकित्सक, मशीनरी, रेल वे, सट्टा ई संबंधित नोकरी व्यवसाय करु शकतात.

**6. आरोग्य-** वृश्चिक राशी जननेंद्रिय व मुत्राशय दर्शवते. जर रोगकारक ग्रह या राशित स्थित असेल तर मूत्राशय, गर्भाशय, अंडाशय ई. संबंधित आजाराची संभावना असते. गुरु व मंगळ स्थित असेल तर शिस्न ग्रंथीमधे वाढ झाल्याने, मैथुन संबंधी त्रास होतो. शनी स्थित असेल तर मूतखडा होऊ शकतो. वृश्चिक जे ६वे स्थान रोग स्थान मेष असल्याने व स्थित ग्रहांनुसार मंगळाच्या प्रभावाने डोके दुखी, निद्रा नाश, नाडी संबंधी पीडा, थंडी वाजणे, मूर्च्छा, गर्मी, लट्ठपणा, झोपेत चालण्याची सवय, ई. त्रास होऊ शकतात.

वृश्चिक स्थिर राशी असल्याने व चंद्र ९ वे स्थानाचा ( बाधक स्थानाचा ) अधिपती असल्याने त्याच्या दशेत आजारपण येऊ शकते. गुरु व शुक्र मारक स्थान अधिपती आहेत त्यामुळे त्याचे ही दशेत स्वास्थ्य खराब राहू शकते. ( ६ वे स्थन आजारपण, २ ७ ८ दुर्धर आजार )

**7. कौटूंबिक-** आनंदी व उत्तम जीवन व सफ़लता प्राप्त करण्याकरता सभोवतालचे वातावरण फ़ार महत्वाचे असते. तुमची ही महत्वाकांक्षा असते की, कि तुम्ही जे काही कराल ते इतरांनी विनाशंका स्वीकारावे. तुम्हाला तुमचे घर परिवार हा सर्व सुख सोयीयुक्त च असावा असे वाटते. व त्यासाठी तुमची अतिरिक्त खर्च करण्याची तयारी असते. घराची सजावट आपल्या आवडीनुसार करावयास आवडते, वाईट परिस्थितीलाही योग्य दृष्टिकोणातून घेता व प्रतिकुलतेचा ही फ़ायदा करुन घेता. व अशा तर्हेने कोणत्याही परिस्थितीत आपल्या कुटुंबास सुख सोयी अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतात.

वृश्चिक जातक फ़ार कमी वेळामधे मैत्रीपूर्ण होतात पण तोपर्यंतच जोपर्यंत त्याना समोरचा गैरफ़ायदा घ्यायचा प्रय्त्न करत नाही. मग त्यांच्याईतका भयानक शत्रू कोणी नसेल. ते कोणत्याही वागण्याचे हिशोब चुकते करतातच. त्यामुळे सच्चे मित्र वा नातेवाईक फ़ार कमी असतात. ज्यांची ते निवड करतात ते शक्ती संपन्न, अधिकार स्थितीत व प्रभावशाली असतील. ११वे स्थान जे मित्रता वा पारिवारिक घनिष्ठ संबंध दर्शवते

त्याचा स्वामी बुध हा ८ वे स्थानाचा पण अधिपती असल्याने, कोण्त्याही व्यक्तीवर विश्वास असत नाही वा थेवू नये, तुमच्या गुप्त गोष्टी सांगत नाहीत अथवा सांगू नयेत.

**8. प्रेम-** वृश्चिक जातक वेगवेगळे मूड बाळगतो. रसिकता व प्रेमाचे बाबतीत गतीशील व उग्र असतात. जोपर्यंत तुम्ही जोडीदाराचा सहानुभूतीपूर्वक, दृढपणाचा सकारात्मक विचार करणार नाही तोपर्यंत तुम्ही त्याचे बरोबर आनंददायक साथ प्राप्त करु शकणार नाहीत.

**9. वैवाहिक-** वृश्चिक जातक आपल्या संसारास स्वर्ग समजतात. जर ते आपल्या जोडीदाराकडून आदर, सन्मान, प्रशंसा प्राप्त करत असतील तर. पण जर त्यांची विचारधारा, वागणे स्वीकारणार नाहीत तर ते दु:खी व खिन्न होतील व अतिरिक्त सोयी सुविधा उपलब्ध करुन त्यांचे प्रेम मिळवण्याचा प्रयत्न करतील. पण तरीही उप्योग नाही झाला तर मात्र घृणा करु लागतील व कठोर व निरदयी होतील. आयुष्याचा जोडीदार दाखवणारे २ रे, ७ वे व ११ वे स्थान चे अधिपती गुरु, शुक्र व बुध आहेत हे तीनही शुभ ग्रह आहेत. त्यामुळे साधारणपणे यांना न्यायप्रिय, ईमानदार, विश्वसनीय व प्रसन्नचित्त जोडीदार मिळतो. अडचणी तेव्हा असतात, जेव्हा या स्थानी पापग्रह असतील अथवा दृष्टी ठेवतील. तो वैवाहिक आयुष्य खुप आनंदात व्यतीत करेल व आपले खरे प्रेम देईल जर त्यांचे संब्न्ध मैत्रीपूर्ण असतील.

दोघेही वृश्चिक जोडीदार असतील तर ते भाग्यशाली असतील. जर जोडीदार मीन व कर्क असतील तर वैवाहिक आयुष्य शांतीपूर्ण असेल. जर जोडीदार कन्या व मकर असेल तर ती अनुरुप जोडी असेल. शुक्र जोडीदार ईच्छापूर्ति व समाधान देणारा असेल.

**10. संतती-** गुरु २ रे व ५ वे स्थानाचा अधिपती आहे. बुध ११ वे स्थानाचा अधिपती आहे. त्यामुळे तुमचा परिवार मोठा झाला तरी तुम्हास संकोच होणार नाही. तुम्ही परिवार नियोजन करालच असे नाही. गुरु व बुधावर पाप ग्रहांची दृष्टी वा युती तुम्हास नि:संतती अथवा अल्प संतती बनवते. काही लोकांना एक च संतती वा मुलगी होईल. यांची मुले बुद्धिमान व भाग्यशाली असतात व कुटुंबात सर्व साधन सुविधा, सुख सोयी प्राप्त करतात.

**11. भाग्य दिवस-** रविवारी उत्तम आर्थिक स्थिती देतो. व्यवसायाकरता प्रभावशाली व्यक्तींना रविवारी भेटा. सोमवार विदेशी लोकांशी संपर्क, यात्रा, यशप्राप्तीसाठी चांगला. सोमवारी अधिक उत्साही व आनंदी असाल. मंगळवार उत्तम स्वास्थ्य देतो, ग्राहक मिळते, स्पर्धा, निवड्णूक, सोसायटी कारिणी, सभा ई. विजयप्राप्तीस चांगला. बुधवारी मित्रव्दारा कष्ट प्राप्त होऊ शकते. कोणत्याही करारावर सहि करु नका. गुरुवारी धनप्राप्तीस, लग्न करण्यासाठी, बैंक खाते उघडण्यासाठी चांगला. शुक्रवारी सामाजिक सफ़लता मिळते व बैंकेची स्थिती कमजोर करतो. शनिवारी अनुत्साही असता. शनिवारी कर्ज परतफ़ेड करा

**12. भाग्य रंग-** पिवळा, लाल, संत्री, क्रीम शुभ निळा, पांढरा, हिरवा अशुभ

**13. भाग्य** रत्न- पोवळा, माणीक, मोती शुभ निलम, हिरा, पाचू अशुभ

**14. भाग्यशाली अंक-** 3, 9, 4, 1, 2, 7 शुभ, 5, 6, 8 अशुभ

-ज्योतिषमित्रमिलिंद (७०५८११५९४७) Whatsapp only

For More info : Visit : jyotishmitramilnd.in